ISSN 2231-1629 Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# गलवान रोड समस्या आणि भारत चीन संबधातील तणाव

**डॉ. रूपराव उकंडराव गायकवाड**
*सहयोगी प्राध्यापक*
*मनोहरभाई पटेल महाविद्यालय सालेकसा.*
*ता.सालेकसा. जि. गोंदिया*

आशिया खंडातील भारत आणि चीन हे लोकसंख्येने सर्वात जास्त मोठे असलेले देश आहेत. चीन दुसया महायुध्दानंतर साम्यवादी क्रांती होऊन अस्तित्वात आले. भारत आणि चीन यांचे संबंध प्राचीन आहेत. भारतातील बौध्द धर्म चीनमध्ये प्राचीन काळात स्विकारला आहे. तसेच भारत आणि चीन यांचे व्यापारीक संबंध सुध्दा अस्तित्वात असल्याचे पुरावे आहेत. परंतु आधुनिक काळात भारत आणि दोन स्वंतत्र राष्ट्रे उदयाला आल्यांतर त्यांच्यामध्ये प्रारंभी केवळ औपचारीक स्वरूपाचे संबध होते. भारत आणि चीन यांचे संबंध आंतरराष्ट्रीय संम्मेलनामध्ये दृष्टीस पडतात.

भारताला स्वातँय 1947 मिळाल्यानंतर भारताने आपल्या शेजारी राज्यांसोबत मित्रत्वाचे संबंध निर्माण करण्याचे धोरण स्विकारले. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी चीनच्या स्वांतत्र्य लढयाला समर्थ देऊन चीन राज्याला मान्यता सुध्दा दिली. परिणामी पाश्चिमात्य राज्य अमेरीका व इतर लोकशाही प्रधान राज्य भारतावर नाराज सुध्दा झाली. कारण चीन साम्यवादी हुकूमशाही राज्य अस्तित्वात आलेले होते. परंतु पं. नेहरूनी चीनला समर्थन देऊन शेजारील राज्यांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. भारत आणि चीन यांचे संबध सुरवातीला काही काळ मैत्रीपूर्ण होते. परंतु कालांतराने त्यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झााला. भारताने चीनवर फार जास्त विश्वास ठेवला. परंतु चीनने नंतर भारताचा विश्वास घात केला व भारतावर आक्रमण करून धोका दिला.

भारताचे पहिले पंतप्रधान पं. नेहरू यांनी भारताची विदेशनिती निश्चित करीत असतांना व्यावहारीक विचार न करता आदर्शावर आधारीत भारताची विदेशनिती निश्चित केली. पं. नेहरूनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये अलिप्तवादी राज्यांचा गट तयार करून अमेरिका आणि रशियाच्या अनुक्रमे भांडवलवादी आणि साम्यवादी या दोन्ही गटांच्या शितयुध्दापासून अलिप्तराहून विकास करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यासाठीच त्यांनी आशिया खंडात शांतता नादावी व शेजारील राज्यांसोबत सलोख्याचे संबध राहावे यासाठी भारताच्या हिताचा विचार न करता आदर्श आणि नैनिकतेच्या आधारावर भारताची विदेशनिती निश्चित केली.

त्याचा परिणाम म्हणजे चीनला संयुक्त रा" ट्रसंघात स्थायी राष्ट्र म्हणून दर्जा मिळण्यासाठी समर्थन केले. चीनच्या राज्याला सर्वप्रथम मान्यता दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वेळोवेळी पं.नेहरूंना सजग केले की, आपण चीन पासून सावध राहायला पाहीजे. चीन हा आक्रमक असून विस्तारवादी आहे. तेव्हा त्याच्यापासून सावध राहून आपली विदेशनिती व्यावहारीक स्वरूपाची असली पाहीजे, "हिंदी चीनी भाई भाई" असा नारा जेव्हा चीनचे राज्यप्रमुख भारत भेटीवर आले तेव्हा दिला आणि 'पंचशील करार' भारत आणि चीन दरम्यान करण्यात आला. तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पंतप्रधान नेहरूना बजावले होते की, "चीन जरी बौध्दधर्मीय राज्य असले तरीही पंचशील तत्व बौध्द धर्माचे आहे. त्याचे पालन चीन करणार नाही. कारण चीन पंचशील हे तत्व धार्मीक तत्व न समजता राजकीय तत्व म्हणून स्विकारत आहे. तेव्हा त्यांच्यावर विश्वास ठेवू नये" परंतु पंतप्रधान नेहरूंनी त्यांच्या इशा—याकडे दुर्लक्ष केले. परिणामता चीनने सप्टेंबर 1962 मध्ये भारतावर हल्ला केला व भारताला अपमानजनक पराभव पत्करावा लागला.

**गलवान संघर्ष**

भारत आणि चीन दोन्ही देशांच्या दरम्यान 3000 कि.मी. ची सीमा आहे. परंतु ही सीमारेषा अस्पष्ट स्वरूपाची आहे. ब्रिटीश भारताच्या काळात इंग्रज आणि चीमध्ये करार होऊन सीमा निश्चित झालेली होती. मॅकमोहन रेषा म्हणून प्रसिध्द आहे. परंतु चीन या मॅकमोहन सीमारेषेला मान्य करायला तयार नाही.

लद्दाखच्या प्रदेशामध्ये गलवान घाटी आहे. त्याघाटीमध्ये नदी आहे. चीनने अक्साई चीन मध्ये रस्ते, बंकर आणि इतर काही सैन्यसुविधा निर्माण केल्या. कारण भारतासोबत जर कोणतेही युध्द उद्भवले तर त्याचा उपयोग करण्यासाठी निर्माण केले आहे. ही सीमारेषा विवादित असून भारतानेही या भागात रस्ते निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी गलवान नदीवर पुलाची निर्मिती करत असतांना चीनच्या सैनिकांनी त्या कामामध्ये अडथळा आणून काम बंद पाडण्यासाठी भारतीय सैन्यावर हल्ला केला.

लद्दाखमधील या प्रदेशात 16 बिहार रेजिमेंट कार्यरत होती. त्याचे कंमाडिंग ऑफिसर कर्नल संतोषबाबु व त्यांच्यासोबत इतर 19 सैनिक होते. 15 जुन 2020 रोजी रात्री चीनच्या सैन्यानी भारतीय सैन्यतुकडीवर क्रुरपणे हल्ला करून 20 सैन्याला निर्दयीपणे ठार मारले. हा हल्ला इतका भीषण व रानटी होता की, क्रूरपणाची परिसिमाच गाढलेली होती. त्यामुळे भारतीय सैन्याने त्याचा विरोध केला. त्यामुळेच भारत आणि चीन यांच्यामध्ये तणाव निर्माण होऊन भारत चीन संबध निकोपाला गेले आहेत. भारत आणि चीन यांच्या दरम्यान 11 वेळा बैठका होऊनही समस्येचे निवारण झाालेले नाही.

गलवान घाटीमध्ये झालेल्या हल्ल्यानंतर दोन देशांच्या प्रतिनिधीमध्ये चर्चा झाल्यानंतर फेब्रुवारीमध्ये

डिसएंगेजमेंट प्रक्रियेला सुरूवात झाली. पैगोन्ग त्सो झील च्या उत्तर भागातील दोन्ही बाजुंच्या सैनिकांनी शस्त्रांसोबत मागे हटत आहेत. परंतु दोन्ही देशांच्या मध्ये जो फिक्शन पॉईट आहे. तिकडे जाण्याची सुरवात दोन्ही देशांच्या सैनिकांनी केलेली नाही. भारतातील वर्तमानपत्राच्या अहवालानुसार दोन्ही देश आपल्या लाईन ऑफ एक्च्युअल कंट्रोल (एल.ए.सी) वर आपल्या सैन्याला तैनात करीत आहेत. यांचा अर्थ असा होतो की, येणा—या काळात डी—एस्केलेशन होणार नाही.

टाईम्स ऑफ इंडियांच्या अहवालानुसार चीनी सैन्याद्वारे सीमारेषेवर सैन्य ठिकाणांवर मोठया प्रमाणात सैन्य तैनात करण्यात येत आहे. तसेच एल.ए.सी.च्या जवळपास आंतरीक ठिकानावरील सैनिकांना एका जागेवरून दुस—या जागेवर हलवत आहेत. भारतीय सेनासुध्दा एल. ए.सी च्या जवळ आपल्या सेनेला तैनात करत आहे आणि आपल्या पायाभूत सुविधेला मजबुत करत आहे.

चीन ने सुध्दा भारतासोबत तणाव असलेल्या ठिकाणी तिबेट आणि अरूणाचलप्रदेश येथेही युध्द सराव केलेला आहे. ॲटीटॅक रॉकेट लॉचर्स, ग्रेनेड लॉचर, ॲन्टी एअर कॉफट मशिनगन अशी अनेक शस्त्रे उपयोगात आणली आहेत. तसेच चीनमधील ग्लोबल टाईम्सच्या वृत्तानुसार मे महिण्यात पीएलए पश्चिम थिएटर कंमाड अंतर्गत झिन झियांग लष्करी जिल्हयात 5200 मीटर उंच माराकरणा—या तोफखाण्याचे एक युनिट तयार केलेले आहे.

भारतीय जानकारांच्या मते डिसइंगेजमेंट प्रक्रियेमध्ये "सतर्क राहून आशा ठेवावी" असे म्हटले आहे. "वास्तविकतेमध्ये चीन दिला शब्द न पाळण्यात कुप्रसिध्द आहे" भविष्यकाळच सांगेल की" चीन केलेल्या कराराचे किती पालन करणार आहेत. इंडियन एक्सप्रेस मधील अहवालानुसार दोन्ही देशांमध्ये विश्वासाची कमी आहे. अशा स्थितीमध्ये भारताला सतर्क न राहण्याची खबरदारी घेता येणार नाही. इंडियन एक्सप्रेस मधील अहवालात असे म्हटले आहे की, चार स्ट्रेटेजींक फिक्शन पॉईट मधील हॉटस्प्रिंग पेट्रोलींग पॉईट 15 आणि 17 गोगरा पोस्ट वरील आपले सैन्य मागे घेण्यास चीनने नकार दिलेला आहे. चीनच्यामते भारताला जे काही मिळाले आहे त्यातच समाधान मानावे.

भारत —चीन सीमा संघर्षाची चर्चा चालू असतांनाच नाकुला मध्ये हल्ला करण्यात आला आहे.

वरील सर्व परिस्थितीचा विचार करता आणि दोन्ही देशाकडून आलेले वक्तव्यावरून असा इशारा मिळतो की, दोन्ही देशांमधील संघर्ष कायम राहील.

**भारत आणि चीन मधील संघर्षाची प्रमुख कारणेः—**

**1) सीमाविवाद :—**

उदा. पैंगोंग त्सो मोटीरी व झील विवाद (2019) डोकलाम विवाद 2017, अरूणाचल प्रदेशामधील आसफिला प्रदेशाचा विवाद इत्यादी सीमा विवाद आहेत.

**2) तिबेट समस्या :—**

भारत आणि चीन मधील तटस्थ देश म्हणून तिबेट होता परंतु चीनने त्यावर कब्जा केला. भारताने मान्यता दिली परंतु तेथील शरणार्थीची समस्येमुळे चीन—भारत संबंध बिघडले आहेत.

**3) अरूणाचल प्रदेश :—**

अरूणाचल प्रदेशावर ही चीन आपला अधिकार सांगत आहे. त्यासाठी तेथील नागरीकांना चीन स्टेपल विसा देऊन विवाद निर्माण करत आहे.

**4) ब्रम्हपुत्रा :—**

चीन ब्रम्हपुत्र नदीवर बांध निर्माण करून उतरचीन मध्ये पाणी पुरवठा करत आहे. भवि" यात यामधून विवाद निर्माण होत आहे.

**5) अक्साईचीन :—**

जम्मु—काश्मीरला चीन भारताचा भाग मानायला तयार नाही. परंतु पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या प्रदेशाला अक्साईचीन म्हणून ताब्यात घेतला आहे. त्यावर चीनचा ताबा आहे. हे सुध्दा विवाद विषय आहे.

**6) साऊथ चायना सी :—**

चीन उर्जानिर्मितीसाठी साऊथ चायना सी मध्ये आपले वर्चस्व स्थापन करण्याचा प्रयत्न करीत आहे. भारताला यापासून दूर ठेवण्याचा प्रयास करत आहे. हा सुध्दा विवादाचा मुद्दा आहे.

**7) हिंदमहासागर :—**

चीन हिंदमहासागरावर वर्चस्व प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न करीत आहे. हिंदमहासागरामध्ये मौल्यवान तेल, खनिजद्रव्य आहेत. त्यावर अधिकार दर्शवित आहे. श्रीलंका, म्यानंमार व पाकिस्तान यांच्यासोबत योजना सुरू करून भारताला एकाकी पाडण्याचा प्रयत्न करत आहे. हा सुध्दा विवादाचा विषय आहे.

**8) पी.ओ.के. :—**

पाक अधिकृत कश्मिर आणि गिलगीर बलाचिस्तान मध्ये चीनने भारतविरोधी कार्य सुरू केले आहे माजी सेनाप्रमुख वि.के.सिंग म्हणतात की, तीन ते चार हजार चीनी आणि पी एल ए सदस्य सामील आहेत.

**9) परमाणू आपूर्तीकर्ता समुह :—**

भारताचा संयुक्त राष्ट्र संघ, सुरक्षा परिषद (INSC) मध्ये कायम सदस्यत्व आणि परमाणू आपूर्ती समुहामध्ये प्रवेश यासाठी चीन समर्थन करत नसून विरोध दर्शवितो. वास्तविकतेमध्ये चीनच्या कायम सदस्यत्वासाठी भारताने समर्थन दिलेले होते.

**10) आतंकवाद :—**

पाकिस्तान आपल्या प्रदेशातून भारतात आतंकवादी गतविधीयॉ करतो. जेव्हा भारत त्याच्या विरोधात संयुक्त राष्ट्रसंघात प्रश्न उचलतो तेव्हा चीन त्यांचा बचाव करतो. यामधून चीन भारत विवाद उत्पन्न होतो.

वरील कारणानी भारत— चीन यामध्ये संघर्षात्मक संबध आहेत.

**भारत— चीन संघषांची उपाययोजना :—**

1. भारत आणि चीन या दोन्ही राज्यांनी मैत्रीपूर्ण सहयोगाची सामान्य प्रवृत्ती विकसीत केली पाहीजे.
2. भारत—चीन च्या नेत्यांनी संधी आणि कराराचे पालन करावे.

3. दोन्ही देशातील आंतरराष्ट्रीय आणि क्षेत्रिय समस्यासाठी आपसात समन्वय निर्माण करावा.
4. भारत आणि चीन यांनी आपसातील मतभेद चर्चेद्वारे सोडवावेत.
5. दोन्ही देशांनी परस्पर लाभकारी योजनामधील सहयोगाचा विस्तार करावा.

वरील उपाययोजनाद्वारां व दिर्घकालीन प्रयत्नानीच दोन्ही देशांमध्ये शांतता निर्माण होईल विकास होईल व समस्यांचे स्थायी समाधान होऊ शकेल अन्यथा दोन्ही राज्यांना विनाशाला सामोरे जावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ :–**


1. *भारत–चीन संबंधो की गती :– संपादक – डॉ. अशोककुमार द्विवेदी*
2. *स्वंतत्र भारत की विदेशनीती :– डॉ. मुनेशकुमार*
3. *https://www.ipf.org.on*
4. *चीन की चुनौती – भारत नीतिप्रतिष्ठान (भारत–चीन संबंध–4)*